Shri. Vasantrao Naik Govt. Medical College, Yavatmal 

श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.– 445001

---

जा.क्र.शावैमय / शरीररचनाशास्त्र /          / 20                    दिनांक :–     /    /20

# मरणोत्तर देहदान

शरीररचनाशास्त्र विभाग

प्रति,

__________________

__________________

__________________

महोदय,

वैद्यकीय शिक्षण व संशोधनाकरीता आपण देहदान करण्याचा आपला मनोदय अभिनंदनीय व स्तुत्य आहे. वैद्यकीय शिक्षणाकरीता मिळालेल्या मृतदेहाचा योग्य तो आदर राखला जातो.

सोबत पाठवित असलेला फॉर्म  शक्य झाल्यास पासपोर्ट साईज फोटो, दोन साक्षीदारांची सही तसेच आपल्या जवळच्या किमान दोन नातेवाईकांच्या सहमतीपत्रावर स्वाक्षरी घेवून पाठवावा. मृत्युनंतर शक्य तितक्या लवकर मृतदेहावर एक रासायनिक प्रक्रिया करणे आवश्यक असते .म्हणुन आपल्या नातेवाईकाचे मृत्युनंतर मुळ दाखल्यासह मृतदेह महाविद्यालयाच्या स्वाधिन करणे आवश्यक असते. हया प्रक्रियेत वेळ जावू नये म्हणुन खाजगी किंवा भाडोत्री वाहनाने, किमान प्रचलीत भाडे देवुन मृतदेह आणता येईल. त्याकरीता अधिध्ठाता/प्राध्यापक शरीररचनाशास्त्र हयांची दूरध्वनीवरून परवानगी घ्यावी.

या व्यतिरीक्त काही माहिती हवी असल्यास खाली दिलेल्या पत्यावर पत्राने किंवा दुरध्वनीने संपर्क करावा.

आपणास दिर्घायुष्य लाभो ही प्रार्थना......

आपला विश्वासू

प्राध्यापक व विभाग प्रमुख,
शरीररचनाशास्त्र विभाग
श्री.व.ना शासकीय य वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ.

;दुरध्वनी क्रमांक अधिष्ठाता कार्यालय २४२४५६, नि. २४२३५६,
प्राध्यापक व विभाग प्रमुख, का. 242456 निवासी वैद्यकीय अधिकारी का. 242245, नि. 242440)

**टीप :– सोबत असलेल्या सहपत्रांची देहदात्यांनी व त्यांचे नातेवाईकांने आवश्य नोंद ध्यावी.**

Created using easyPDF Printer
Click here to purchase a license to remove this image

# देहदानाची पध्दत

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथील शरीररचनाशास्त्र विभागात विद्यार्थ्याच्या शिक्षणाकरीता आणि इतर वैद्यकीय संशोधनाकरीता मृतदेह ऐच्छीक पणे स्विकारल्या जातात.
त्यासाठी खालील बाबीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. मृत्युनंतर आपला देह दान केला जावा अशी इच्छा असणा-या कुठल्याही व्यक्तीस सोबत असलेला फॉर्म भरून दयावा लागतो. हा फॉर्म शरीररचनाशास्त्र विभागातुन कार्यालयीन वेळेत तसेच पोस्टाद्वारे देखील उपलब्ध होउ शकेल. काही कारणामुळे हा फॉर्म भरला गेला नसेल परंतु देहदात्या व्यक्तीने देहदानाची इच्छा आपल्या कुटूंबियात प्रकट केली असेल तर मृत्युनंतर देखील जवळचे नातेवाईक ऐनवेळेवर मयत व्यक्तीच्या वतीने फॉर्म भरून देहदान करू शकतात. ( हया करीता प्रोफॉर्मा वेगळा असलेला प्रोफार्मा शरीररचनाशास्त्र विभागात उपलब्ध आहे. )

२. विहित नमुन्यातील फॉर्म भरतांना देहदात्यांने आपला एक पासपोर्ट साईज फोटो फॉर्म वर लावावा. फॉर्म वर नमुद केल्यानुसार जवळच्या नातेवाईकांची ( आई, वडील, पती, पत्नी, मुलगा, मुलगी किंवा इतर ) नावे लिहुन त्यांच्या स्वाक्षरी साक्षीदार म्हणुन फॉर्म वर घेणे अनिवार्य आहे. हया सर्व बाबीची पुर्तता झालेला फॉर्म विभागात दिल्यानंतर विभागाच्या रजिष्टर मध्ये हयाची नोंदणी होईल व तो क्रमांक आपणास कळविण्यात येईल. अशा त-हेने नोद झालेल्या फॉर्मची झेराक्स प्रत आपल्या कुटुंबियाजवळ देउन ठेवावी.

३. मृतदेह विभागात आणते वेळी देहदात्याचे रजिस्टर्ड मेडीकल प्रॅक्टीशनर नोंदणीकृत डॉक्टरचे मृत्युचे प्रमाणपत्र ( Death certificate ) सादर करणे आवश्यक आहे.देहदात्याचे मृत्युनंतर नातेवाईकांनी दुरध्वनीद्वारे तात्काळ वैद्यकीय महाविद्यालयाच्या शरीररचनाशास्त्र विभागात कार्यालयीन वेळेत तथा कार्यालयीन वेळेव्यतीरीक्त वैद्यकीय उपअधिक्षक किंवा अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी (C.M.O. ) हयांच्याशी सर्पक साधावा.

४. मृत्युचे कारण खाली नमुद केल्या पैकी असेल तर मृतदेह स्विाकारल्या जाणार नाही.

१. संसर्ग जन्य रोग उदा. गुप्त रोग ( एडस, सिफीलीस, ) रक्तातील जंतु संसर्ग (सेप्टीसेमिया ) , रक्ताचा कावीळ ( हिपॅटाटीस - बी ) , संक्रमीत क्षयरोग ( ॲक्टीव्ह टी. बी. ) , ॲक्टीव्ह लेप्रसी कृष्ठरोग
२. शरीरावर जखमा असल्यास उदा. बेडसोअर्स, गॅगरीन इ.
३. अपघाती मृत्यु असल्यास
४. मेडीको- लीगल केस असल्यास ( पोलीस केस )

टीप :- नोंदणीकृत डॉक्टरांचे मृत्युबाबतचे मृत्युचे कारण स्पष्ट असलेले प्रमाणपत्र असणे अनिवार्य राहील अन्यथा देहदान स्विाकारण्यात येणार नाही.

Created using
easyPDF Printer
Click here to purchase a license to remove this image

(महाराष्ट्र शासन )
शरीररचनाशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ. - ४४५००१

---

मरणोत्तर देहदान करू इच्छीणा-या व्यक्ती आणि त्यांच्या नातेवाईकासाठी आवश्यक असलेली माहिती ......

---

देहदान कायदा १९७६ (सुधारीत ) मुंबई ॲनाटॉमी ॲक्ट ५ (ब ) प्रमाणे कोणाही व्यक्तीने त्याच्याा जीवंतपणी लेखी अथवा तोंडी देहदानाची इच्छा व्यक्त केली असेल किंवा त्या व्यक्तीच्या निधनानंततर नातेवाईकांची इच्छा असेल तर मृतव्यक्तीचा मृतदेह अधिकृत वैद्यकीय संस्थानात दान करता येतो. त्या करीता न्यायालय किंवा पोलीसाची परवानगी लागत नाही. (कॉरोनर कोर्ट परीपत्रक दिनांक २२ जानेवारी १९८७ )

मृतदेहाचा उपयोग वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थांच्या शिक्षणासाठी आणि संशोधनासाठी केला जातो.
देहदान हे फार मोठे सामाजीक कार्य आहे.

**<u>देहदानाची इच्छा असणा-या व्यक्तीसाठी नियम...........</u>**

१. प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीररचनाशास्त्र विभाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांचेकडुन इच्छापत्राचे दोन फॉर्म मागवावे. त्यापैकी एक फॉर्म स्वत : भरून आणावा अथवा पोस्टाने पाठवावा आणि दुसरा फॉर्म भरून आपल्या नातेवाईकांजवळ त्यांच्या माहितीसाठी ठेवावा.
२. इच्छापत्र हे नातेवाईकावर बंधनकारक नाही.
३. इच्छापत्र भरलेले नसेल तरीही देहदान करता येते पण नातेवाईकांस आपली इच्छा लेखी असावी म्हणुन इच्छापत्र भरावे.
४. आपल्या श्रध्देनुसार धार्मीक विधी करूनही आपण देहदान करू शकता.

**<u>देहदात्याच्या  निधनानंतर मृताच्या नातेवाईकांचे कर्तव्य...........</u>**

१.मृत व्यक्तीने इच्छापत्र भरले असेल तर मृताची अंतिम इच्छा पूर्ण करणे हे आपले कर्तव्य समजावे.
२. निधनानंतर ताबडतोब जवळच्या फॅमिली डॉक्टरांना बोलावून मृत्युच्या कारणासह मृत्युचा दाखला ध्यावा. त्यांची एक प्रत देहदानाच्या वेळेस शरीररचनाशास्त्र विभागास सादर करावी.तसेच मृत्यु नोंद प्रमाणपत्राची एक प्रत हया कार्यालयास सादर करावी.
३. मृतदेह कार्यालयीन वेळेव्यतिरीक्त आणल्यास आपण अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय उपअधिक्षक / निवासी वैद्यकीय अधिकारी  यांना लेखी विनंती अर्ज सादर करून तो मृतदेह कार्यालय सुरू होईपर्यत (९:०० वाजेपर्यत ) नउ वाजेपर्यत शवागारातील शीतपेटीत ठेवावा.
४. मृत्युनंतर शक्यतोवर सहा तासाच्या आत मृतदेह वैद्यकीय महाविद्यालयात आणावा कारण उशीर झाल्यास मृतदेह देहदानाच्या उपयोगी राहणार नाही.
५. बाहेरगावावरून मृतदेह आणण्यासाठी शासकीय नियमाप्रमाणे गाडीच्या चालकास त्याचा वाहतुक खर्च दिला जाईल. गाडीच्या चालकाकडे त्यासाठी छापील पावती असणे गरजेचे आहे.
६. मृतदेह ठेवतांना व  उतरवितांना कर्मचा-यास मदत करावी. तीच तुमची शेवटची सेवा समजावी.
७. मृतृदेह आणतांना फक्त जबाबदार व्यक्तींनीच बरोबर यावे.
८. देहदानानंतर आपणास प्रमाणपत्र दिले जाईल.
९. अनैसर्गिकरित्या मृत्यु पावलेल्या व्यक्तीचे आणि पोलीसांच्या ताब्यात असलेले मृतदेह देहदानाकरिता शरीररचनाशास्त्र विभागात स्वीकारले जाणार नाहीत. याची नोंद ध्यावी.

प्राध्यापक व विभाग प्रमुख,
शरीररचनाशास्त्र विभाग
श्री.व.ना.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ

Created using
easyPDF Printer
Click here to purchase a license to remove this image

# देहदात्यांनी भरावयाचे इच्छापत्र

नांव :--

पत्ता :--

फोन नबंर :-

दिनांक :-

फोटो

प्रति,
मा.अध्यक्ष,
मरणोत्तर देहदान समिती व.ना.शा.वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ.

विषय :- मरणोत्तर देहदान करण्याबाबत...

मा.महोदय,

माझ्या मृत्युनंतर माझे संपूर्ण शरीर शैक्षणिक, संशोधन अथवा तत्सम कार्याकरीता दान करण्याची माझी इच्छा आहे. आपल्या फॉर्म मध्ये नमुद केल्याप्रमाणे माझ्या जवळच्या नातेवाईकांनी सदर इच्छापत्र स्वाक्षरी करून दिले आहे. तरी आपणास विनंती करण्यात येते की, माझ्या मृत्युनंतर माझा मृतदेह संशोधन, शैक्षणीक /विच्छेदन वा इतर कोणत्याही आवश्यक हेतु करता वापरण्यास माझी हरकत नाही.

धन्यवाद.

आपला / आपली विश्वासू

नांव व स्वाक्षरी

सदर इच्छापत्र आम्हा सर्वाच्या उपस्थीतीत लिहुन देण्यात आले आहे. सदर व्यक्तीच्या देहदानास आमचा कोणताही आक्षेप नाही. तसेच त्यांच्या मरणोत्तर देहदानानंतर त्यांचा देह शैक्षणीक अथवा इतर कार्यासाठी वापरण्यास आमची काहीही हरकत नाही.

| अ.क्र | नांव | देहदात्याशी नाते | पत्ता/फोन नंबर | सही |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

Created using easyPDF Printer
Click here to purchase a license to remove this image

## संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक खालीलप्रमाणेः-

१. वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, यवतमाळ.(07232) 239868
२. उपवैद्यकीय अधिक्षक/निवासी वैद्यकीय अधिकारी (R.M.O. ) –( 07232) 245705-123
३. अपघात वैद्यकीय अधिकारी ( C.M.O.) –(07232)-245705
४. शरीररचनाशास्त्र विभाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ :-
a)डॉ.(श्रीमती )सनोबर ईस्मतुल्ला शेख प्राध्यापक व विभाग प्रमुख,शरीररचनाशास्त्र विभाग. ...9403533144
b) डॉ. निलीमा पाटील सहयोगी प्राध्यापक शरीररचनाशास्त्र विभाग- 9404642684
c) डॉ. अर्चना कन्नमवार सहयोगी प्राध्यापक शरीररचनाशास्त्र विभाग- 8551050317
d) डॉ. गजानन मस्के सहायक प्राध्यापक शरीररचनाशास्त्र विभाग - 8275772489
e) डॉ. लिना खोब्रागडे सहायक प्राध्यापक शरीररचनाशास्त्र विभाग - 9766126303
f) डॉ. पूर्वा करडीले सहायक प्राध्यापक शरीररचनाशास्त्र विभाग --- 9404847887
g)डॉ. अर्चना टाले सहायक प्राध्यापक शरीररचनाशास्त्र विभाग - 9552507845
h) डॉ. ज्योती जाधव सहायक प्राध्यापक शरीररचनाशास्त्र विभाग - 9028340021

.

Created using easyPDF Printer
Click here to purchase a license to remove this image

## मृत्युनंतर देहदान समिती

१. मा. अधिष्ठाता श्री.व.ना.शा.वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ -- अध्यक्ष
२. प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीररचनाशास्त्र विभाग,---सदस्य सचिव
३. वैद्यकीय अधिक्षक ---सदस्य
४. वैद्यकीय उपअधिक्षक/ निवासी वैद्यकीय अधिकारी-सदस्य
५. प्राध्यापक व विभाग प्रमुख, न्यायवैद्यकशास्त्र विभाग -- सदस्य
६. प्राध्यापक व विभाग प्रमुख, विकृतिशास्त्र विभाग ---सदस्य
७ प्राध्यापक व विभाग प्रमुख, औषधवैद्यकशास्त्र विभाग--सदस्य
८. प्रशासकीय अधिकारी (रूग्णालय) -- सदस्य

Created using easyPDF Printer
Click here to purchase a license to remove this image

**मृतकानी इच्छापत्र आधी भरलेले नसल्यास नातेवाईकां तर्फे वेळेवर भरण्याचा फॉर्म :**

मृतकाचा पासपोर्ट फोटो

नाव :
पत्ताः
दिनांक :
प्रति,

मा. प्राध्यापक व विभाग प्रमुख,
शरीररचनाशास्त्र विभाग
श्री.व.ना.शा.वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.
विषय :- मरणोत्तर देहदान करणेबाबत...
मा. महोदय,

माझे/ माझी------------ चे मृत्युनंतर त्याचा / तीचा मृतदेह वैद्यकीय शिक्षण व संशोधनाकरीता दान करण्यास माझी संपुर्ण सहमती व संमती आहे. आपल्या फॉर्म मध्ये नमुद केल्यानुसार मयताच्या जवळच्या नातेवाईकांनी सदर इच्छापत्र स्वाक्षरी करून दिले आहे. तरी आपणास विनंती की, सदर मृतदेह शिक्षण संशोधनासाठी वापरण्यास माझी हरकत नाही.
धन्यवाद.

आपला/आपली विश्वासू
नाव/स्वाक्षरी
मयताशी असलेले नाते
फोन क्रमांक :-

सदरील इच्छापत्र आम्हां सर्वाच्या उपस्थितीत लिहुन देण्यात आले आहे. सदर व्यक्तीच्या देहदानास आमचा कुठलाही आक्षेप नाही. तसेच त्यांच्या देहदानानंतर त्यांचा देह शैक्षणीक किंवा इतर कार्यासाठी वापरण्यास आमची काहीही हरकत नाही.

| अ. क्र. | नांव | मृतकाशी नाते | पत्ता/फोन क्र. | स्वाक्षरी/सही |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

Created using easyPDF Printer
Click here to purchase a license to remove this image